# इस्त्राएल लोकांनी काय केले पाहिजे हे यहोशवाने पाहिले

*देव आम्हांला दृष्टांत देतो तेव्हा आम्ही त्याची योग्य*
*माहिती गोळा करून त्याचे आज्ञापालन करण्यासाठी योजना आखली पाहिजे.*

*सध्याच्या गरजा पूर्ण करणाऱ्या आणि तुमच्या सहकाऱ्यांना वेळ असेल त्याप्रमाणे कार्यक्रम ठरवा. मुलांच्या शिक्षकांनी* V1b *ह्या अभ्यास वाचावा.*

## १. प्रभूचे आज्ञापालन करण्यासाठी प्रार्थना व वचनाच्याद्वारे तयारी करा.

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू येशू, तू आमचा पुढारी आहेस. तुझी इच्छा आम्हांला कळव, आम्ही काय करावे ते सांग आणि आम्हांला चांगली माहिती दे म्हणजे आम्हांला सूज्ञपणे निवड करता येईल.''*

**गणना १३:१-१६ ह्या शास्त्रभागात पाहा...**

- *देव काय करणार होता। (उत्तर वचन २: कनान देश इस्त्राएल लोकांना देणार होता)*
- *लोकांनी काय करायचे होते. (उत्तर : देश हेरणे म्हणजे त्या देशा विषयी माहिती घेणे.)*
- *हे करण्याची आज्ञा त्यांना कोणी दिली (पाहा वचन ३.)*

*हेरांनी काय जाणून घ्यावया होते ते* **गणना १३:१७-२४** *मध्ये पाहा...*



- *नेमके कोठे जायचे. (वचन १७ सूचनाः कनानमध्ये दोन मुख्य) प्रांत होते, डोंगराळ प्रांत आणि नेगेबचा सपाट प्रदेश.)*
- *लोकांच्या सामर्थ्या विषय, ते किती बलवान आहेत (१८)*
- *लोकांची एकंदर संख्या किती आहे.*
- *प्रदेश नेमका कसा आहे (१९)*
- *शहरे कशा प्रकारची आहे.*
- *तेथील शेतीवाडी (२०)*
- *तेथील जंगलाचा भाग.*
- *स्थानिक उत्पादन काय आहे.*

### योग्य माहिती जमवा

*देवाने आम्हांला त्याच्यासाठी प्रत्येक भाषिक गट, जमात, लोक आणि राष्ट्र यामधून शिष्य तयार करण्यास सांगितले आहे. आम्ही प्रत्येक लोकगटाची माहिती करून घेतली पाहिजे. यामुळे प्रतिसाद देणारी कुटुंबे कोणती आहेत हे शोधून त्यांना शिष्य करण्या विषयी आम्हांला सूज्ञपणे निर्णय घेता येईल. लोकांना शोधणे हे पिक गोळा करण्यासारखे आहे असे येशूने सांगितलेच आहे, त्यामुळे आम्ही तीन प्रकारची माहिती मिळवतो:*

**शेत जमिनीविषयी**

*१. प्रत्येक विभागात कोणते वेगवेगळे लोकगट राहतात?*

*२. प्रत्येक लोक गटाची लोकसंख्या किती आहे?*

*३. त्यांची भाषा, सामाजिक स्तर, जात, आर्थिक परिस्थिति आणि मुख्य सांस्कृतिक वैशिष्टये काय आहेत?*

*४. ते एकमेकांशी कशा प्रकारे संवाद साधतात?*

*५. त्यांच्या धार्मिक श्रद्धा आणि आध्यात्मिक रिवाज काय आहेत?*

*६. त्यांना येशूबद्दल काय माहिती आहे आणि ख्रिस्ती लोकांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन काय आहे?*

**शेतकऱ्याविषयी**

*७. इतर कोणत्या ख्रिस्ती मंडळया, मिशन्स व संस्था लोकांना शिष्य करण्याच्या कामात सहभागी आहेत?*

*८. ते कोणत्या लोकगटांमध्ये काम करतात?*

*९. त्यांची कार्यालये कोठे आहेत आणि त्यांचे सेवक कोठे काम करतात?*

*१०. या प्रत्येकापैकी कोणते सेवाकार्य चांगले होत आहे?*

*११. त्यांच्या सेवकांची सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक वैशिष्टये काय आहेत?*

*१२. यापैकी कोणते सेवाकार्य करणारी संस्था तुमच्याशी आणि एकमेकांशी सहकार्य करील?*

**मिळणाऱ्या पिकाविषयी**

*१३. प्रत्येक लोकगटातील किती टक्के लोक आधीच शिष्य आहेत?*

*१४. शिष्यांची टक्केवारी वाढत आहे की त्यात घट होत आहे?*

*१५. दरवर्षी किती टक्के नवे विश्वासणारे लोक बाप्तिस्मा घेतात?*

*१६. दरवर्षी नव्या मंडळया व गटांचे रोपण करण्याचे प्रमाण किती टक्के आहे?*

*१७. मंडळयांच्या नव्या पुढाऱ्यांना कशा प्रकारे प्रशिक्षण दिले जाते?*

*१८. नवे शिष्य कोणत्या विविध माध्यमांच्या मार्फत केले जातात?*

*देवाने यहोशवाला कोणता दृष्टांत दिला ते* **यहोशवा १:१-११** *मध्ये पाहाः*

- *देवाचे अभिवचन (२ व ५)*
- *यहोशवाचे आज्ञापालन (८ व ९)*
- *यहोशवाच्या योजना (१० व ११)*

**२. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवडयातील कार्यक्रमांविषयी योजना आखा**

*नवशिक्या पुढाऱ्यांच्या प्रशिक्षण सत्रांमध्ये त्यांना त्यांचे स्वप्न सांगण्यास मदत करा, त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी ते कसा प्रयत्न करतील याची त्यांच्याबरोबर योजना आखा आणि योग्य माहिती मिळवण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करा.*


*तुमच्या स्वतःच्या लोकगटामधील पिकाविषयी भाग १ मधील प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करा.*

*इतर मंडळया व संस्थांशी संपर्क साधून योग्य माहिती मिळवण्याची व्यवस्था करा किंवा ती माहिती मिळवण्यासाठी सहकार्याचा हात पुढे करा.*

*इतर कोणी या कामासाठी तयार असेल तर त्यांचा शोध गट स्थापन करा. ते तुमच्या भागातील प्रत्येक लोकगटाची माहिती जमा करून तुम्हांला सांगतील.*

*इतर ख्रिस्ती पुढाऱ्यांकडे, तुमच्या देशातील ख्रिस्ती संशोधन कार्यालयांविषयी चौकशी करा. त्या कार्यालयांशी संपर्क साधून तुमच्या विभागातील ''सुवार्ता न पोचलेले'' लोक व ठिकाणांची माहिती घ्या.*

**मिळालेले पिक**



### ३. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेची योजना आखा.

*गणना अध्याय १३ व १४ मधून गेलेल्या हेरांचा वृतांत वाचा किंवा त्याचे नाट्यीकरण करा. पुढील गोष्टींकडे लक्ष कनान देश हेरण्यास वेधा...*

- *लोकांनी आज्ञापालन करण्यास नकार देऊन ४० वर्षे शनात कसे भटकले आणि रावटी त्यांचा कसा अंत झाला.*
- *विश्वासू यहोशवा व कालेब ह्यांना नव्या पिढीचे नेतृत्व करून तिला वचनदत्त भूमीमध्ये नेण्याची कशी परवानगी दिली.*

**मुलांना** *त्यांनी तयारी केलेल्या गोष्टी सादर करू द्या.*

**चर्चा करा** *दुर्लक्षित लोकगटांचा तपास करण्यासाठी वा त्यांच्याकडे सेवक पाठवण्या विषयी योजना आखणे. दुसऱ्या कोणी हे काम केले असेल तर त्यांना या विषयीचे परिणामफल सांगण्यास सांगा.*

**प्रभुभोजनाची** *ओळख करून देण्यासाठी योहान २१:९-१४ हा शास्त्रभाग वाचा. लवकरच आपणही येशूबरोबर पुनरुत्थानामध्ये एकत्र जेवणार आहोत आणि या मोठ्या मेजवानीमध्ये सर्व लोकांनी सहभागी व्हावे हे आमचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करून सांगा.*

*दोन वा तीनजणांचे* **लहान गट** *करून जवळंच असणाऱ्या दुर्लक्षित लोकगटांसाठी, त्यांच्यामध्ये सेवा करण्याचा मानस असणाऱ्यांसाठी प्रार्थना करा.*

*एकत्रि* **पाठ करा** *गणना १३:१८*

**तुमच्या लोकांना शिकवावयाचे शब्द**

**संशोधन:** *लोक आणि ठिकाणे या विषयी काळजीपूर्वक अचूक माहिति जमा करणे, याचा उपयोग त्यांना कशी मदतकरता येईल याची योजना करण्यास होईल.*

**सुवार्ता न पोचलेले:** *इतर ख्रिस्ती लोकांच्या मदती शिवाय आपल्या स्वतःच्या लोकांमध्ये सुवार्ता प्रसार करण्यास पुरेसे ख्रिस्ती लोक व मंडळया नसणारे लोकांचे गट.*

**शेतजमीन:** *सुवार्ता न पोचलेली ठिकाणे आणि तिथे राहणारे लोकगट.*

**शेतकरी:** *लोकगटामध्ये लोकांना शिष्य करण्यास व मंडळया सुरु करण्यास तयार असणाऱ्या ख्रिस्ती लोकांची संख्या व प्रकार.*

**मिळणारे पिक:** *येशूवर विश्वास ठेवून बाप्तिस्मा घेणारे लोकगटामधील व्यक्तींची संख्या.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net